# Certificate

This is to certify that the Research paper entitled "सिन्धु संस्कृती कालीन स्त्रि-पुरुषांचे दाग - दागिने : एक अभ्यास" submitted by प्रा.डॉ. सुनेवार किशन रामलू has been published in "Excel's International Journal of Social Science and Humanities (An International Multidisciplinary Journal)" Vol. 1 No.11 April 2019 Issue, ISSN 2277-7539 (Print) Impact Factor (5.631 SJIF) The Research contribution was greatly appreciated and well received by the Review Board Members. The excel publication house would like to express deep sense of gratitude for your esteemed contribution.

Date: 01-05-2019

(Managing Editor)

ADAT VIDYA... DEGLOOR COLLEGE, DEGLOOR SOCIETY'S * Dist.Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

April - 2019
Vol. 1 No. 11

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded


13) **Brain Based Learning (BBL)**
Dr. Khan Shahnaz Bano Mohammad Ashfaque 81

14) **Technological Challenges in Higher Education**
Dr. Mirza Mahefooz Baig 90

15) **Development of Value added Products Utilizing Uncommon Green Leafy Vegetables**
Dr. Varsha S. Zanvar, Pradnya B. Dhutmal 95

16) **New growth in E-commerce digital marketing**
Mr. Gaikwad Deepak Devendra 103

17) **Teaching Aptitude of Teachers: A Need to Understand**
Dr. Pathan Md. Wasim Md. Shabbir 106

18) **"Drought and It's Effect on Human life"**
Dr. Vijay Baisane, Mr. Ankush Gaike 115

19) **Objectification and Colonization of women in What the Body remembers?**
Mrs. Nusra Mehtab 120

20) **सिन्धु संस्कृती कालीन स्त्रि-पुरुषांचे दाग - दागिने : एक अभ्यास**
प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू 125

## About
## Excel Publication

**The Philosophy:**
Excel's International Journal of Humanities and Social Science (EIJHSS) is an open access, peer-reviewed and refereed journal published by Excel Publication House India. The main objective of EIJHSS is to provide an intellectual platform for the international and Indian scholars. EIJHSS aims to promote interdisciplinary studies in humanities and social science.

Submissions should indicate an understanding of the relevant literature and the contribution of the submissions to this body of research. Empirical articles should have an appropriate methodology and be able to relate their findings to the existing literature. Methodological articles must attempt to show how they further existing theory.

The review process: The review process followed by Excel Journal is systematic and thorough. Articles submitted to the journal are initially screened by the editor for relevance and overall quality as judged by the presentation of concepts, methodology and findings. Inappropriate or weak submissions are not forwarded for a formal review. Those considered appropriate are submitted to a double blind review process.

Potential contributors: Every research-oriented individual and institution, and every research student, faculty working anywhere in the world is invited to explore fruitful connections with Excel Publication.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# *Contents*


1) **A Study of Problem Solving Ability of Std IX Urdu Medium Students of Aurangabad City** — 01
Dr. Mirza Mahefooz Baig

2) **Year 2016's Demonetisation and its Impact on Indian Economy & Various Sectors** — 06
Shaikh Mohammed Shoeb

3) **Skill Development Programs For Entrepreneurship Development by Government of India** — 15
Dr. Kishor L. Salve

4) **Risk in financial services: An Overview** — 18
Prof. Sharda P. Bhudhwant

5) **Relationship between Educational Problems and Academic Achievement of Secondary School students of Aurangabad City** — 23
Dr. Shaikh Tahemina Naaz

6) **Happiness, Self Esteem among Young and Adult Individuals** — 31
Dr.Aparna Ashtaputre, Dr. Sandip N. Sisode

7) **Managing Human Resource is challenging job** — 35
Dr. Madhuri Sitaram Ban

8) **Expressions of Racial Consciousness in Langston Hughes' 'Simply Heavenly'** — 43
Mr. Nisargandh Vihar, Miss. Kamble Varsha

9) **A study of Modernism and Post- Modernism** — 55
Dr. Pathan P.Y.

10) **Morphology and Implications for English Language Teaching** — 59
Siddiqui Zahed Ali Sadiq Ali

11) **Transformations in Modern European Drama** — 66
Dr. Khan Ansarullah Shafiullah

12) **Impact of Globalisation on Business and Management Education** — 79
Dr. Mohammed Abdul Raffey

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

EXCEL'S INTERNATIONAL JOURNAL OF SOCIAL SCIENCE & HUMANITIES
(An International Multidisciplinary Journal)
Vol. I No.11 - April, 2019
ISSN 2277-7539 (Print)
Impact Factor 5.631 (SJIF)

# सिन्धु संस्कृती कालीन स्त्रि-पुरुषांचे दाग - दागिने : एक अभ्यास

* प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू

श्रृंगार करने ही मानवाची सहजप्रवृत्ती आहे. आदिम काळात मानव हा प्राण्यांची हाडे, पक्ष्यांच्या पिसांनी व इतर वस्तुंनी आपले शरिर सजवत होता. त्यामध्ये काळानुसार बदल होत गेला व अलंकार निर्मितीचा विकास होत गेला. मातीचे, लाकडाचे, रंगीत दगडांचे, हस्तीदंतीचे, तांबे, कांस, सोने, चांदी इत्यादीचे दागीने तयार होत गेले. त्यांना आकर्षक डिझाईनमध्येही बनविले जाऊ लागले. अलंकार हे स्त्रि-पुरुष या दोघांनाही आवडत होते. आणि आजही आवडतात. ते दागीने नखापासून ते शिखापर्यंत धारण केले जात होते. ते कुण्या धातुचे असावेत हे सुध्दा महत्वाचे नव्हते. वेळ, परिस्थिती, आवड, आर्थीक परिस्थिती यावर ते अवलंबुन होते. भारतात प्राचीन काळापासुन दागीने वापरले जात होते. हे आपल्याला शिल्पातुन, नाण्यातून, मुर्तीतून व विविध अवशेषांतुन स्पष्ट दिसते.

सिन्धु संस्कृती कालीन स्त्रि-पुरुष दोघेही दागिने वापरत होते. त्याकाळात मण्यांच्या मालीका, कर्णफूल, बांगडया, कंगन, अंगठ्या, बाजुबंद इत्यादी प्रमुख दागीने होते. तत्कालीन स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांच्या अंगावर दागिण्यांची रेलचेल कमी दिसते. सिन्धु संस्कृती काळात कांस, तांबे, सोने, चांदी, मिश्रीत धातू आणि विवीध प्रकारच्या रंगी बिरंगी खडयांचा वापर दागिण्यात केला जात होता. रत्नांचा वापर केला जात नव्हता असे दिसते. दागीन्यात मण्यांचा वापर फार मोठ्या प्रमाणावर केला जात होता. चन्हुदरो हे मण्या बनविण्याचे प्रमुख केंद्र होते. चन्हुदरोत मण्यांची अनेक दुकाने असल्याचे पुरावे सापडले आहेत.[१] सुमेरियन संस्कृती व इतर देशात

* इतिहास विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *



भारतातून मण्यांचे निर्यात केले जात होते. ते मणी रंगीन मातीचे, चमकदार दगडाचे, तांबे - कांस - सोनं - चांदी - आदी धातूचे, शंखाचे, स्फटिकाचे, हस्तीदंतीचे, हाडाचेंही बनविलेले आढळते. त्यातील कांही मण्यांना रंगविलेही जात होते. लोदालच्या उत्खननात रंगी - बिरंगी मण्या सापडल्या आहेत. दागिण्यात रंगी - बिरंगी मण्याच वापरल्या जात होत्या. बहुतांश मण्या निळया आणि हिरव्या रंगाच्या होत्या. स्टेटाईट दगडांच्या मण्याभोवताली सोन्याचा पत्रा चढवलेलाही आढळला. [२]

मोहेंजोदारोत गोलाआकार मण्या जास्त प्रमाणात आढळल्या. त्या मण्या चमकदार लाल मातीच्या बनविलेल्या होत्या. त्या मण्यांचा आकार आणि रंग इजिप्त आणि सुमेरियन मण्यांशी मिळता जुळता होता. कांही मण्यांना साचाद्वारे, गोल, चतुर्भुजाकार, चौकोण, त्रिकोण, त्रीपानी, एकपानी, सुर्यमुखी इत्यादी आकार दिले जात होते. ह्या मण्या पाठीमागच्या बाजूने चपटे तर समोरील बाजूस वर उठावदार बनविले जात होते.[३] सिन्धुकालीन लोक मणी बनविण्यात आणि त्यांचा अलंकारात वापर करण्यात अतिशय निपुण होते. त्या विविध मण्यांपासून विवीध प्रकारच्या माळा बनवित होते. आणि दागिणे म्हणून त्यांचा वापर करीत होते. तत्कालीन विविध दाग-दागिन्यांची माहिती पुढीलप्रमाणे.

**१) पायातील दागिने :**

सिंधु संस्कृतीकालीन बऱ्याच आकृत्या / प्रतिमांचे पाय तुटलेले आहेत. पण हरप्पा व मोहेंजोदारोतील कांही मुर्त्यांवर पायातील दागीने दाखविलेले आढळले.त्यावरुन तत्काळात पायात पैंजन, वाळे, वापरण्याची प्रथा होती हे स्पष्ट होते. हरप्पाच्या एका पुरलेल्या मृत व्यक्तीच्या पायात मण्यांनी गुंफलेला पायातील दागीना आढळला आहे. हरप्पाच्याच एका मातीच्या फलकावरील शिल्पाच्या पायात दागीना दाखविला आहे.[४] मोहेंजोदरोत आढळलेल्या एका कांस धातूच्या मुर्तीच्या पायात गोल असा गुंफलेला नक्षीदार दागीना आढळला त्याचप्रमाणे मोहेंजोदरोच्या मातीच्या प्रतिमेच्या पायात दोन गोलाकार दागिने आढळले. एका पाषाण प्रतिमेत मण्यांनी गुंफलेले पैंजन असल्याचे आढळले. एका आकृतीत पैंजनावर चोटे -छोटे गोल आकार सुंदर असे चिन्ह बनवलेले आढळले. याशिवाय उत्खननात काहीसे जाड असे वाळेही सापडले ओहत.[५]

**२) कमरपट्टा :**

सिंधुकालीन काही मुर्त्यांमध्ये कमरपट्टे आढळले स्त्री-पुरुष दोघेही कमरपट्टा वापरत होते. हे कमरपट्टे मण्यांच्या मालीकांचे आणि धातूंचे तुकडे जोडून बनविलेले आढळले. हरप्यातील एका मातीच्या पुरुष मुर्तीवर विविध

ABAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

(142)



कोणाकार मण्यांचा कमरपट्टा, चपटया मण्यांचा कमरपट्टा, आणि गोलाकार मण्यांचा संयुक्त असा कमरपट्टा दाखविला आहे. हरप्पातील एका स्त्रिमुर्तीवर धातुची रुंदी अशी पट्टीका दाखविली आहे. एका आकृतीवर चार धातुचा कमरपट्टा आहे. आणखी एका प्रतिमेवर दोन माळांचा कमरपट्टा दाखविला आहे.[६] मोहेंजोदरोच्या एका मुर्तीवर नाभीच्या खाली तीन धातुंची पट्टीका किंवा कमरपट्टा दाखविला आहे. एका मुर्तीवर पाच कमरपट्टे दाखविले. त्यातील दोन मण्यांच्या माळाचे तर तीन धातूच्या पट्यांचे आहत. हे कमरपट्टे सुंदर असे अलंकृत केलेले होते.[७]

### ३) अंगठया :

सिंधू संस्कृती कालीन लोक हातांच्या बोटात अंगठयाही वापरत होते. त्या अंगठया तांबा, कांस,सोना,माती दगड, शंख इ. पासून बनविल्या जात होत्या. पण अंगठयांचे प्रमाण त्यामानाने कमी प्रमाणात आढळले. हरप्पाच्या उत्खननात एका मृतक व्यक्तीच्या बोटात अंगठी असल्याचे आढळले. याशिवाय हरप्पात सोने, तांबे तसेच अल्बास्टर (पांढरा नरम दगड) यापासून बनविलेल्या अंगठयाही आढळल्या आहेत. एका आकृतीत मातीपासून बनविलेली अंगठी दाखविली तर आणखी एका आकृतीत स्टेटाईट (पांढरी गारगोटी ) दगडाची अंगठी दाखविली आहे.[८] मोहेंजोदरो येदो तांब्याच्या तारेवर ठसे उमटवलेल्या पाच अंगठया आढळल्या. येदोच चांदी, शंख व स्टेटाईट दगडापासून बनविलेल्या अंगठयाही आढळल्या. स्टेटाईटपासून बनविलेल्या अंगठीवर त्रीपानाचे अलंकरण केलेले आहे.[९] तसेच रोपडच्या उत्खननात एका मृतकाच्या मध्यबोटात तांबे धातूची अंगठी आढळली. लोदालमध्येही अनेक तांब्याच्या अंगठया आढळल्या आहेत.

### ४) हातात वापरावयाचे दागीने :

सिन्धु संस्कृती काळात बाजुबंध, कंगण, बांगडया इत्यादी हातात धारण करण्याची प्रथा होती असे दिसते. सोने, चांदी, कांस, तांबा, शंख, शिंपले, माती, स्टेटाईट दगड, काच यापासून बनवलेले हातात वापरावयाचे कंगन, कडे, बांगडया, बाजूबंद बनविले जात होते. हरप्पाच्या एका पुरुषप्रतिमेत गोल मण्याचे कंगन मनगटावर असल्याचे दाखविले आहे.[१०] मोहेंजोदारोच्या एका पुरुषप्रतिमेत बाजुबंध दाखविले आहे. त्यावर कमळाच्या आकाराचे अलंकरण आहे. सोने व चांदीच्या पत्र्याचे कंगनही आढळले आहेत. त्या कंगनचे मुख आतल्या बाजूने जोडलेले होते. तसेच कांस व तांबे धातूच्या कांहीशा जाड तारेपासुन कंगन बनविले जात होते. त्यातील कांहीचे दोन टोक जोडलेले होते तर कांहीचे दोन टोक तसेच खुले होते. मोहेंजोदरोच्या कांस धातुच्या नर्तकीने कंगन धारण केल्याचे दाखविले. मोहेंजोदरोत चांदी आणि तांबे धातूच्या कांही बांगडया

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



सापडल्या. मोहेंजोदरोच्या नर्तिकेने एकाच हातात हात भरुन कंगन घातलेले आहेत. तेदीलच एका मातीच्या मुर्तीने उजव्या हातात चार बांगडया घातल्या. ह्या बांगडया धातूच्या चपटया पट्टीपासून बनवलेल्या होत्या असे वाटते. आणखी एका प्रतिमेत भुजावर सहा आणि मनगटावर पाच बांगडया घातलेले दार्खविले आहे. कांही प्रतिमात मनगटावर तीन बांगडयाच दाखविल्या आहेत.[११] चन्हुदरोच्या उत्खननातही अनेक प्रकारचे कंगन प्राप्त झाले आहेत. ते कंगन एक प्रकारच्या चमकदार मातीपासून बनविलेले होते. ते कंगन रंगवण्याचीही प्रथा होती. एका कंगनवर हिरव्या रंगाचे अवशेष आढळले. त्या कंगनांच्या किनाऱ्यावर कांहीसे खड्डे आढळले त्यावरुन ते अलंकृत होते असे स्पष्ट होते. त्याकाळात मातीच्या कंगनचे प्रचलन जास्त होते. त्यांचा वापर सामान्य लोकांत जास्त होता. मातीचे कंगन जास्त भाजत होते. म्हणुन ते एकमेकांवर वाजवल्यास त्यातुन धातू सारखा ध्वनी येतो. हे कंगन साच्यात बनवित होते. शंखापासून बनविलेले कंगनही आढळले. तत्कालीन स्त्रि-पुरुष एकाच हातात कंगन वापरत असल्याचे प्रतिमावरुन स्पष्ट दिसते.[१२]

**५) गळयातील दागीणे :**

सिन्धु संस्कृतीकालीन गळयातील बहुतांश दागिने विवीध मण्यांपासुन बनविण्यात आले होते. धातुच्या पट्टीपासुनही गळयातील हार बनवित होते. हरप्पा येदो चार पदरी दोनशे चाळीस सोन्याच्या मण्यांचा एक हार आढळला आहे. आणखी एका हारात तेरा लटकन आढळले. त्यातच सोन्याचे चार लंबगोलाकार मण्या होत्या आणि २६ लंबगोलाकार स्टेटाईट दगडाच्या मण्या होत्या. त्या मण्यांच्या दोन्ही बाजूला सोन्याच्या टोप्या लावलेला होत्या. त्या सर्व मण्या व लटकन ताराच्या सहाय्याने एकमेकांना जोडलेले होते. असाच आणखी एक हार आढळला त्यात तेरा लटकन आहेत.[१३] मोहेंजोदरोत स्त्रिया गळयात दोन किंवा तीन प्रकारचे हात घालत होत्या. त्यापैकी एक निव्वळ गळयाला चिटकून असत (नेकलेस), दुसरा वक्षस्थळाच्या कांहीसे वर पर्यंत लांब होता तर तिसरा वक्षस्थळापर्यंत लांब होता. मोहेंजोदरोत एका चांदीच्या पात्रात कांही दागीने ठेवलेले उत्खननात आढळले. त्यापैकी गळयात वापरला जाणारा हारही आढळला. तो फिकट हिरव्या रंगाच्या चमकदार यशब दगडांपासून बनवलेला मणी रुपात आहे. त्यात कांही सोन्याच्या मण्याही आहेत. त्या हारात खालच्या बाजूला अगेट दगडापासून बनविलेले सात लटकन आहेत. ते लटकन सोन्याच्या तारात गुंफलेले आहेत. त्या सात लटकनमध्ये सोन्याचे पत्रे लावलेल्या मण्या गुंफलेल्या आहेत. त्याचबरोबर त्या चांदीच्या पेटीत आणखी एक चोटया - चोटया सोन्याच्या मण्यांचा एक हार आहे. मोहेंजोदारोतच एका तांब्याच्या पात्रात एक हार आढळला. त्यात अकीक दगडाच्या लांबट मण्या आहेत. त्या मण्या ४.८५ इंच लांब आहेत. ह्या मण्या चमकदार लाल रंगाच्या आहेत. त्या मण्यांच्या दोन टोकाला छिद्रे आहेत. त्या लांब मण्यांच्या मध्ये पुन्हा गोलाकार मण्या आहेत.

ADARSH SHIKSHAN PRASARAK EDUCATION SOCIETY
DEGLOOR COLLEGE
Dist.Nanded



### ७) शिरोभुषण :

सिंधू संस्कृतीकालीन स्त्रि-पुरुष प्रतिमांवरुन स्पष्ट दिसते की तत्कालीन स्त्री- पुरुष आपल्या कपाळावर सोनं, चांदी, तांबे ह्या धातुपासून बनविलेली पट्टीका धारण करीत होते. [१८] मोहेंजोदरोच्या उत्खननात अशीच एक पातळ सोन्याची पट्टीका सापडली आहे. तीच्या दोन्ही टोकाला छीद्र आहेत त्यात दोरी ओवून ती पट्टीका कपाळावर बांधली जात होती. मोहेंजोदारो येथील योगी पुरूषाच्या कपाळावर अशीच पट्टीका दाखविलेली आहे. तेथेच एका पट्टीकाचे तुकडे सापडले आहेत. त्याच्या मध्यभागी अनेक छिद्र आहेत. त्यात विविध रंगीबिरंगी मणके लावून तीला अलंकृत करीत असावेत. मोहेंजोदारोतच १६.५ इंच लांब आणि ०.५५ इंच रूंद अशी पट्टीका सापडली. त्यावर ०.४ इंच व्यासाचे छिद्र आहेत. हे कदाचित अलंकरण करण्यासाठी होते[१९] मोहेंजोदारोत एक चांदीची पट्टीका सापडली त्यावर छोट्या - छोट्या बिंदूनी अलंकरण केलेले आहे. चन्हूदरोमध्ये तांबे धातूची पट्टीका सापडली तीची लांबी ३.४५ इंच आहे.[२०] हरप्पाच्या उत्खननात कांही खंडीत पट्टीकाही सापडल्या आहेत. त्याही मादयावर बांधण्यासाठी वापरल्या जात होत्या. ह्या पट्टीका मादयावर बांधण्याचे कारण म्हणजे एक तर आपली केशरचना यदास्थितीत ठेवण्यासाठी बांधले जात होते. तर दुसरे कारण म्हणजे आपल्या केशसज्जाला अलंकृत करण्यासाठी बांधले जात असावे. बॅबीलोनियन संस्कृतीतील लोकही अशा प्रकारच्या पट्टीका वापरत असल्याचे दिसते. आजही राजस्थानात कांही महिला अशा पट्टीका वापरतांना दिसतात.

### ८) लटकन अलंकार :

सिंधू कालीन लोक आपल्या गळ्यातील, कानातील, कमरेवरील दागीण्यात ह्या लटकन अलंकाराचा वापर करीत होते. हे लटकन मातीपासून, रंगीत दगडांपासून प्रामुख्याने बनविले जात होते. हे लटकन गोलाकार, लंबगोलाकार, विविध कोण आकार बनविले जात होते. असलेल्या दागिन्यांना सुशोभित करणे हा त्यांचा उद्देश होता.[२१] मोहेंजोदारोत मातीचे बनविलेले तीन लटकन मिळाले आहेत. पैकी पहिला त्रिकोणाकार आहे तो २.३५ इंच लांब व ०.२५ इंच जाड आहे. त्या लटकनच्या खालच्या बाजूला छोट्या-छोट्या छिद्राच्या दोन मालीका आहेत. त्या छिद्रात निश्चितच कांहीतरी अलंकरण केलेले होते. हे लटकन वस्त्रांमध्ये लावण्यासाठी वापरत असावे. दुसरा लटकन गोल आहे. त्याचा व्यास १.६५ इंच आहे. हा लटकन मागील बाजूस चपटा आहे तर समोरील बाजूस उठावदार आहे. यातही छोटे-छोटे छिद्र आहेत म्हणून हा सुध्दा अलंकृत होता. तिसरा लटकन वृताकार आहे. त्याचा व्यास १.५ इंच आहे तर जाडी ०.२ इंच आहे. याचाही मागील भाग चपटा व समोरील भाग उठावदार आहे. त्यालाही खालच्या बाजूला छिद्रांची मालीका आहे.[२२] कदाचित हे लटकन विविध रंगांनी रंगविले जात असावेत. त्यांच्या छिद्रांमध्ये बारीक रंगीत खड्यांचे पुन्हा छोटे छोटे

DEGLOOR COLLEGE DEGLOOR * Dist.Nanded *

146



लटकन लावून किंवा त्या छिद्रात रंगीबिरंगी खडे लावून अलंकृत करीत असावेत. हरप्पाच्या उत्खननातही कांही लटकन सापडले त्यात एक पंख आकाराचा आहे. तो फिकट बदामी रंगाचा आहे. त्याची लांबी १.५५ इंच तर जाडी ०.५ इंच आहे. दुसरे सापडलेले लटकन पानाच्या आकाराचे आहे. तो निळ्या रंगाच्या मातीचा बनविला आहे. त्याच्या मध्यभागी कांही रेषांचे अलंकरण आहे. तीसरा लटकन स्टेटाईट खड्याचा पुष्पाकार आहे. त्यात सहा पाकळ्या दाखविल्या आहेत. आणि पुष्पाकाराच्या मध्यभागातून थोडासा उठावदारपणा दाखविला आहे. चौथा लटकन हृदयाच्या आकाराचा आहे त्याला तिन छिद्र बनविलेले आहेत.[२३]

ह्या लटकनांशिवाय सिंधू संस्कृतीच्या उत्खननात कांही केशपिना आणि वस्त्र पिनाही सापडल्या आहेत. एका चांदीच्या पत्र्याचा 8 ह्या आकाराचा अलंकार आढळल्या. त्यात मागील बाजुला तीन सोनाच्या पट्ट्यांचाही वापर केलेला आहे. त्या अलंकारात मागील बाजूला दोन छिद्र केलेले आहेत. कदाचित त्यात एखादी पीन टाकून केसात किंवा वस्त्रात वापरत असावेत. असाच एक तांब्याचा अलंकारही सापडला. त्यात रंगीत मण्यांचा वापर केलेला आहे. आणखी एक मातीने बनविलेला सहा पाकळ्यांचा पुष्पाकार अलंकार सापडला आहे. त्याच्या मध्यभागी छिद्र आहे. चन्हूदरो येदो दोन रंगी असा एक चमकदार अलंकार सापडला आहे. त्यात सहा छिद्रे आहेत.[२४] अशाप्रकारे सिंधू संस्कृती काळात डोक्याच्या केसांपासून ते पायापर्यंत वापरले जाणारे अनेक अलंकार उत्खननात सापडले आहेत. हरप्पा-मोहेंजोदारो, चन्हुदरो, इत्यादी ठिकाणी हे अलंकार जास्त प्रमाणात आढळले आहेत. त्या दागीन्यांचे डिझाईन आजही मार्गदर्शक करणारे आहेत. केशपिना, वस्त्रपिनाही वापरले जात होते. दागिण्यात विविध रंगीत खड्यांचे अलंकरण केले जात होते, रंगीत खड्यांचे लटकण लावले जात होते. म्हणजे तत्कालीन लोक किती प्रगत होते. याची कल्पना येते. म्हणून सिंधू संस्कृती हे भारताच्या इतिहासातील सुवर्णपान आहे. हे पं. नेहरूंनी योग्यच म्हटले होते असे वाटते.

## संदर्भग्रंदा सुची :


१. चन्हुदरो एक्सकेवेशन, मॅक ई. १९४३, पृ. १९०
२. लोदाल ॲन्ड इन्डस सिव्हीलायझेशन, एस.आर.राव, पृ. १०२
३. मोहेंजोदरो अॅन्ड इन्डस सिव्हीलायझेशन, मार्शल, जॉन, खंड २, पृ. १०-१३
४. हरप्पा, एन्शीएन्ट इंडिया, व्हिलर आर, पृ. ८६ आकृती - १७
५. पुर्वोक्त - ३, खंड -२, फलक ९५, आकृती २६
६. एक्सकेवेशन ऑफ हरप्पा, वत्स एम.एस., खंड-२, फलक ७६-७७ आ. ४९, ५१

७. स्टडी ऑफ इंडस व्हॅली, राय, गोविंदचंद्र, वाराणसी, फलक ३४, १९
८. पुर्वोक्त - ४, पृ. ८६
९. पुर्वोक्त - ३, पृ. ५२८
१०. पुर्वोक्त - ६, खंड -२, फलक -७६
११. पुर्वोक्त - ३, खंड -३, फलक -९४, १४३
१२. पुर्वोक्त -१, पृ. १९०-९२
१३. पुर्वोक्त - ६, फलक -१३७
१४. पुर्वोक्त -३ , खंड-३, फलक १४८, १४९, १५१
१५. पुर्वोक्त
१६. पुर्वोक्त -६, खंड-२, फलक -१३९, आकृती ८-१४, २१-२३
१७. एक्सकेव्हेशन एट मोहेंजोदारो, खंड-२, फलक -७५, आ. - १
१८. स्टडीज इन द डेव्हेलपमेंट ऑफ ऑर्नामेंटस् अॅन्ड ज्वेलरी इन प्रोटोहिस्टॉरीक इंडिया - राय, गोविंदचंद्र, वाराणसी, १९६४, फलक - ६
१९. पुर्वोक्त - ३, खंड -३, फलक -१४३, आ. १५
२०. पुर्वोक्त- १, पृ. १९४
२१. पुर्वोक्त -३, खंड-३ फ. १४७ आ. ३०, ३४, ३६
२२. मोहेंजोदारो अॅन्ड इन्डस सिव्हीलायझेशन, मार्शल - जॉन, खंड -३ फलक - १३३
२३. एक्सकेव्हेशन ऑफ हरप्पा - वत्स, एम.एस., खंड-२, फलक - १३३, १३९
२४. पुर्वोक्त - १, पृ. १९८-१९९

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded